**दिनांक १६/०१/२०१९ कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीची २१ वी टिपणी (Agenda)**
**मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई.**

**१.मागिल बैठकीचा आढावा.**

| अ.क्र | विषय | झालेली चर्चा व घेण्यात आलेला निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नंदकुमार पवार<br><br>1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | • समितीने या तक्रारीबाबतचा Factual Report गेल्या ३ महिन्यापासून प्रलंबित असल्याने प्राधान्याने या तक्रारीबाबतचा अहवाल देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पनवेल यांना निर्देश दिले.<br>• या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी रायगड यांना विचारणा केली असता त्यांनी सदर जागेवर शिवाजी महाराज स्मारकाचे काम चालू आहे तसेच कोठेही कांदंळवनाची तोड झालेली नाही, सदर ठिकाणी पाणथळ नसल्याबाबत अहवाल प्राप्त झाला आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी रायगड यांना दिल्या. | जिल्हाधिकारी रायगड | **अहवाल अप्राप्त** |
| २ | Complaint No: KW7<br>Wetland destruction<br>अज्ञात व्यक्ती गायमुख रेतीबंदर गांधी प्लॉट येथे भरणी | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांच्या अधिकाऱ्यांनी कांदळवनास कोणत्याही प्रकारची हानी होणार नाही तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने एकत्र स्थळ पहाणीचा Factual Report देण्याबाबत समितीने तहसिलदार ठाणे यांना सांगितले होते.<br>• तहसिलदार ठाणे यांनी एकत्र स्थळ पाहणी झाली असून त्याचे अहवाल प्राप्त झाले असलेचे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार ठाणे यांना या बाबतचा अहवाल समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | ठाणे महानगरपालिका<br>आणि<br>तहसीलदार, ठाणे<br>(जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल प्राप्त** |
| ३ | श्री. धिरज परब - भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास .<br>स्थळ :- भाईंदर प, जि.ठाणे. | • सदर जागेवर कांदळवनावर होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे वारंवार महानगरपालिकेमार्फत निष्कासीत करण्यात आले होते असेही तहसिलदार ठाणे यांनी सांगितले होते.<br>• त्या अनुषंगाने समितीने सध्यस्थितीत स्थळ पहाणी करुन त्या जागेवर असलेले अतिक्रमण व माती भराव हटविण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना निर्देश दिले. | तहसिलदार ठाणे<br><br>आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका | **अहवाल अप्राप्त** |
| ४ | श्री. धिरज परब :-<br><br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. | • समितीने ही जागा पाणथळ आहे का त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास व त्यासाठी आवश्यक G.P.S. Reading सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना निर्देश दिले होते.<br>• त्या अनुषंगाने तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या G.P.S. Reading नुसार सदस्य सचिवांनी पहाणी केली असता सदरचे क्षेत्र हे NWIA वेटलॅन्डमध्ये येत नाही. (Based on portal mrsac.maharashtra.gov.in/wrd.) | तहसिलदार ठाणे<br><br>(जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल प्राप्त** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ चा ऱ्हास करून व सीआरझेड चे उल्लंघन. | • समितीने ही जागा पाणथळ आहे का त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले त्यासाठी आवश्यक G.P.S. Reading सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना दिल्या होत्या.<br>• त्या अनुषंगाने तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या अहवालातील छायाचित्रातील G.P.S. Reading नुसार सदस्य सचिवांनी तपासणी केली असता सदरचे क्षेत्र हे किनाऱ्यालगत वेटलॅन्डमध्ये कांदळवन असल्याचे दिसून येते.<br>(Based on portal mrsac.maharashtra.gov.in/wrd.) | तहसिलदार ठाणे.<br>(जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल प्राप्त** |
| ६ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव-बांधकामा प्रकरणी. | • समितीने तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करण्यास सांगितले व त्यासाठी आवश्यक G.P.S. Reading सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार वसई यांना निर्देश दिले.<br>• सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले होते.<br>• परंतु तहसिलदार वसई यांच्या कडून या तक्रारीबाबत अद्याप अहवाल व G.P.S. Reading प्राप्त झालेले नाही. | तहसिलदार वसई<br>(जिल्हाधिकारी पालघर) | **अहवाल अप्राप्त** |
| ७ | श्री. धिरज परब :- आमदार नरेंद्र मेहता यांनी सत्ता व पदाचा दुरुपयोग करून महापालिका आदींच्या संगनमताने पर्यावरणाचा केलेला ऱ्हास ७११ क्लब | • या तक्रारी संदर्भात अद्याप स्थळ पहाणी झाली नसल्याने समितीने तात्काळ स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा लेखी अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना तहसिलदार ठाणे यांना दिल्या. | तहसिलदार, ठाणे<br>(जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल अप्राप्त** |
| ८ | श्री. धिरज परब<br>मीरारोडच्या कनकिया भागात सर्वे क्र. ३८ मध्ये पाणथळ, कांदळवन, सीआरझेड मध्ये पर्यावरणाचा ऱ्हास केले बाबत. | • समितीने ही जागा पाणथळ आहे का त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले व त्यासाठी आवश्यक Co-ordinates सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार ठाणे यांना सांगितले होते.<br>• त्या अनुषंगाने तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या अहवालात G.P.S. Reading नुसार सदस्य सचिवांनी पहाणी केली असता सदरचे क्षेत्र हे पाणथळ असल्याचे दिसून येते.<br>• तसेच सदर ठिकाणीतील काही भाग पाणथळ यादीत नव्हाता परंतु, भरतीच्या पाण्यामुळे काही भागात पाणथळ क्षेत्र तयार झाले आहे. त्या अनुषंगाने या जागेची सध्यस्थितीत पहणी करण्यासाठी MRSAC नागपूर यांच्यामार्फत तपासण्याची आवश्यकता आहे. | तहसिलदार ठाणे व<br>(जिल्हाधिकारी ठाणे)<br>मिरा-भाईंदर महानगरपालिका – अहवाल प्राप्त | **अहवाल प्राप्त** |
| ९ | श्री. अजिंक्य पाघधरे<br>पालघर जिल्ह्यातील मौजे धाकटी | • समितीने ही जागा पाणथळ आहे किंवा कसे त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सांगितले त्यासाठी आवश्यक Co-ordinates सदस्य सचिवांना देण्याबाबत तहसिलदार | तहसिलदार डहाणू<br>(जिल्हाधिकारी पालघर) | **अहवाल अप्राप्त** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | डहाणू येथे महसूल गावं बाडापोखरण येथिल सर्व्हे नं.३७१ अ १/१/१/१ मधिल कांदळवन पाणथळचा नाश करून बांधलेल्या बेकायदा बांधकामबबाबत. | डहाणू यांना सांगितले.<br>• सदर ठिकाणी पाणथळ जागा आहे किंवा कसे हे तपासून पुढील कार्यवाही करावी असे समितीने सदस्य सचिवांना सांगितले होते.<br>• परंतु तहसिलदार वसई यांच्या कडून या तक्रारीबाबत अद्याप अहवाल व G.P.S. Reading प्राप्त झालेले नाही. | | |
| १० | श्री. धिरज परब:- भाईंदर पूर्व जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन पाणथळ सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केलेबाबत. | • तहसिलदार ठाणे यांनी दि.१२.१२.२०१८ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर ठिकाणी जेट्टीचे व रॅम्प चे काम व रस्त्याचे कच्चे बांधकाम केले असलेबाबतचे दिसून येते मात्र कांदळवनाचे नुकसान अथवा कत्तल झाल्याचे दिसून येत नाही.<br>• तसेच या पूर्वी असलेल्या कांदळवनाचे नुकसान झाले किंवा कसे याबबत MRSAC नागपूर यांचे अभिप्राय घेणेबाबत कळविले आहे.<br>• तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या अहवालात G.P.S. Reading नुसार सदर क्षेत्र पाणथळ नसल्याचे दिसून येते. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल प्राप्त** |
| ११ | श्री. धिरज परब :- जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | • तहसिलदार ठाणे यांनी दि.१२.१२.२०१८ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर जागेवर कांदळवनाचे नुकसान अथवा कत्तल झालेली नसून या पूर्वी असलेल्या कांदळवनाचे नुकसान झाले किंवा कसे याबबत MRSAC नागपूर यांचे अभिप्राय घेणेबाबत कळविले आहे.<br>• तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या अहवालात G.P.S. Reading नुसार सदर क्षेत्र पाणथळ नसल्याचे दिसून येते. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल प्राप्त** |
| १२ | श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील नवघर गाव मागील सरकारी खाजण सर्वे क्र. १५ मध्ये महापालिकेने पाणथळ, कांदळवन व सीआरझेड १ मध्ये बेकायदा टाकलेला कचरा, भराव व अन्य बांधकामे काढून कांदळवनाची लागवड | • तहसिलदार ठाणे यांनी दि.१२.१२.२०१८ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर जागेवर कांदळवना लगत झोपडयांचे बांधकाम झाले असल्याबाबत निदर्शनास आले असून काही भागात मंदिराचे, तबेल्याचे कच्चे पक्के बांधकाम करण्यात आले आहे.<br>• तसेच सदर ठिकाणी कांदळवनालगत खेळाचे मैदान तयार करणे कामी माती भराव करुन सपाटी करण केलेले आहे.<br>• सध्यस्थितीत पहाणी दरम्याने कांदळवनाचे नुकसान अथवा कत्तल झालेली नसून या पूर्वी असलेल्या कांदळवनाचे नुकसान झाले किंवा कसे याबबत MRSAC नागपूर यांचे अभिप्राय घेणेबाबत कळविले आहे.<br>• तहसिलदार ठाणे यांनी दिलेल्या अहवालात G.P.S. Reading नुसार सदर क्षेत्र पाणथळ नसल्याचे दिसून येते परंतु काही छायाचित्रातीली G.P.S. Reading नुसार तेथे | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) | **अहवाल प्राप्त** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | करणेबाबत. | किनाऱ्यालगत पाणथळ जवळ कांदळवन दिसून येते. | | |
| १३ | श्री. बद्री चॅटर्जी<br>Wetland reclamation at, opposite of Cielo, LODHA spendora, Bhayander pada, Ghodbandar road, Thane. | • तहसिलदार ठाणे यांनी दि.११.१२.२०१८ रोजी दिलेल्या अहवालानुसार सदर जागेच्या नाल्याच्या विरुध्द बाजूर फार मोठया प्रमाणात कांदळवन असून अलिकडच्या बाजूस कांदळवन दिसून येत नाही.<br>• तसेच सदर जागेच्या नाल्यालगतचे कांदळवन क्षेत्र हे दाट असून अलिकडील बाजूस कांदळवन क्षेत्र हे फार पूर्वीच नष्ट झाल्याचा अंदाज येतो तसेच काही ठिकाणी नाल्यालगतच्या झाडांची तोड करुन ते तेथेच टाकलेली असून सदर झाडे वाळलेली असून ती कांदळवन आहेत किंवा कसे याबाबत बोध होत नसल्याने तज्ञ व्यक्तीमार्फत तपासणी होणे आवश्यक आहे असे कळविले आहे.<br>• तथापि सदर संपूर्ण भराव हा कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत झालेला दिसून येत आहे. | जिल्हाधिकारी ठाणे | **अहवाल प्राप्त** |
| १४ | श्री. सुनिल अगरवाल<br>Destruction of Uran wetlands & Mangroves - Dastaan Node. | • या तक्रारी संदर्भात समितीने सिडको यांना सदर जागेची तक्रारदारासोबत स्थळ पहाणी करुन त्या बाबतचा लेखी अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड | **अहवाल अप्राप्त** |
| १५ | श्री. नरेशचंद्र सिंग<br>(अभिव्यक्ती गृप)<br>Please Help Us Save Kharghar Sector 35 Pond - TOI report. | • सिडको यांचा दि १५.०१.२०१९ रोजीच्या अहवालानुसार से-३५ E खारघर येथे मोठया प्रमाणात घनकचरा टाकून मोठयाप्रमाणात कांदळवनाचे नुकसान झाले आहे अशी तक्रार श्री. नरेशचंद्र सिंग यांनी केली होती.<br>• त्याअनुषंगाने सिडको यांनी तक्रारदारासोबत स्थळ पाहणी केली असता सेक्टर ३५ E हा भाग डोंगर क्षेत्रात येत असून या ठिकाणी कांदळवन येण्याचा प्रश्न उद्भवत नाही. ही बाब तक्रारदारास दूरध्वनीद्वारे निदर्शनास आणुन दिल्याचे अहवालात नमूद केले आहे. | सिडको | **अहवाल प्राप्त** |

- **नवीन प्राप्त तक्रार**

| **अ.क्र** | **तक्रारदार व तक्रारीचा विषय** | **तक्रार** | **कार्यवाही करणारी यंत्रणा** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. नरेशचंद्र सिंग<br>(अभिव्यक्ती गृप) | Immediately Stop Dumping of Debris and Reclamation work in Sector 17 Kharghar Coastal Wetland (CRZ notified zone) and Restore to Original State | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड | **अहवाल अप्राप्त** |